# दि नॅशनल को-ऑप.बँक लि.

National Bank

( नोंदणी क्र.: १२००१-१९४७ )

**प्रशासकीय व नोंदणीकृत कार्यालय** : २१४, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१

**Email:** national@ncbmumbai.com, Tel – 022-22828553 / 49763384

## ७७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

( फक्त सभासदांसाठी )

सन्माननीय सभासद,

सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेच्या सभासदांची **७७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. १७ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता वालचंद हिराचंद हॉल, चौथा मजला, आय एम सी बिल्डिंग, आय एम सी मार्ग, चर्चगेट, मुंबई -४०० ०२०** येथे होणार आहे. सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

### ★ सभे पुढील कामे ★

१) दि. ०८ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या ७६व्या वार्षिक सर्व साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठीचा संचालक मंडळाचा अहवाल, ऑडीटेड ताळेबंद व नफा तोटा पत्रक वाचून स्वीकृती देणे.

३) वैधानिक लेखापरीक्षकांच्या सन २०२३-२४ सालाच्या तपासणी अहवालाची नोंद घेणे.

४) सन २०२२ -२३ सालाच्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाच्या दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.

५) संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे अहवाल वर्ष २०२३-२४ सालाच्या नफा विभागणीस मान्यता देणे.

६) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने मान्यता दिलेल्या वैधानिक लेखापरीक्षक यांच्या नेमणुकीची नोंद घेणे.

७) संचालक मंडळाने सन २०२४- २५ करिता सादर केलेल्या वार्षिक अर्थसंकल्प आणि विकास आराखड्याची नोंद घेणे.

८) संचालक व त्यांच्या नातेवाईकांच्या कर्जाची नोंद घेणे.

९) ७७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील अनुपस्थित सभासदांची अनुपस्थिति क्षमापित करणे.

१०) सन्माननीय अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २५ जुलै २०२४**

**संचालक मंडळाच्या वतीने**
**वर्षा किर्ती पटेल**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

---

### * विशेष सूचना *

**१ )** गणसंख्ये अभावी सभा तहकूब करावी लागल्यास, सभा त्याच ठिकाणी त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर म्हणजे सकाळी ठीक ११.०० वाजता सुरू होईल व त्या सभेस गणसंख्या पूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

**२ )** वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज सुरळीत होण्यासाठी ज्या सभासदांना बँकेच्या कामकाजाविषयी विधायक स्वरुपाची माहिती विचारावयाची असेल त्यांनी त्यांच्या सूचना सभेच्या तारखे पूर्वी सात दिवस अगोदर नोंदणीकृत व प्रशासकीय कार्यालयास लेखी कळवाव्यात.

3) सभेला येतांना वार्षिक अहवालाची प्रत सोबत आणावी.

वार्षिक सर्व साधारण सभेची सूचना व वार्षिक अहवाल आपल्या वेबसाईट **www.nationalbank.co.in** वर उपलब्ध आहे आणि तसेच सर्व शाखांमध्येही उपलब्ध आहे.